Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# बजाज फाउंडेशन वर्धाच्या समाजोपयोगी कार्याची वर्तमान प्रासंगिकता

**पद्माकर अ. बाविस्कर**
पीएच. डी. संशोधक
म. गांधी विचारधारा विभाग
रा. तु. म. ना. वि., नागपूर
मोबाईल नं - 9371830868
Email - padmakar22kar@gmail.com

---

**सारांश (Abstract) :**

*जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा व कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन ह्या दोन्ही संस्था बजाज ग्रुप अंतर्गत कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था आहेत. या दोन्ही संस्थेने विशेष करुन वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागात गरीब, वंचित, शेतकरी, शेतमजूर यांच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक उन्नतीसाठी विविध उपक्रमाद्वारे 20 व 21 व्या शतकात गांधीजींच्या रचनात्मक कार्याचा आधार घेऊन कार्य करीत आहे. वर्तमानात बजाज फाउंडेशनच्या दोन्ही संस्थांचे समाजोपयोगी कार्यात फार मोठे योगदान पाहायला मिळते. सध्याच्या आर्थिक सामाजिक राजकीय परिस्थितीत बजाज फाउंडेशन वर्धाच्या समाजोपयोगी कार्याची वर्तमान प्रासंगिकता फार मोठी मोलाची आहे.*

*'जमनालाल बजाज फाउंडेशन' ही संस्था 1977 मध्ये वर्धा येथे स्थापन करण्यात आली. जमनालालजी बजाज यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केलेले कार्य वर्तमानात सतत चालू राहावे व त्यांनी केलेल्या कार्याला वर्तमानातही जनतेच्या कल्याणासाठी कार्यरत ठेवावे म्हणून तत्कालीन प्रधानमंत्री श्री मोरारजीभाई देसाई यांच्या शुभहस्ते दिनांक 4 नोव्हेंबर 1977 ला त्या संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. वर्ष 2003 मध्ये 'कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा' या संस्थेची स्थापना करण्यात आली व त्या संस्थेचे कार्य 2009 साली सुरु झाले. या दोन्ही संस्था स्थापन करण्याच्या मागे एक हाही उद्देश होता की जमनालाल बजाज व कमलनयन जमनालाल बजाज यांच्या स्मृती सतत समाजासमोर जागृत राहाव्यात व त्यांच्याकडून समाजोयोगी कार्याची आवड समाजात निर्माण व्हावी.*

*साहित्य पुनरावलोकन ज्या संदर्भात पुस्तकाच्या आधारे केले आहे अर्थात दुय्यम साधनाद्वारे केले आहे त्याची संपूर्ण माहिती समीक्षेसह या शोधनिबंधाच्या "साहित्य पुनरावलोकन" या मुद्यांमध्ये सविस्तर दिलेली आहे. दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग ज्या पुस्तकाच्या रुपाने करायला मिळाले आहे जो की शोध कार्यात बहुमोलाचा ठरला आहे. या संपूर्ण पुस्तकांची माहिती संदर्भसूची मध्ये देण्यात आलेली आहे.*

*वरील उल्लेखित सेवाभावी संस्थेने वर्तमानात अर्थात 20 व 21 व्या शतकात ग्रामीण भागातील वंचित, गरीब, शेतकरी, शेतमजूर यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी जे कार्य केले ते बहुमोल आहे. याचे सविस्तर वर्णन शोधनिबंधात 'परिणाम' या परिच्छेदात केले आहे. ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी बरेच काही प्रयत्न केले आहे. या संशोधन निबंधाच्या माध्यमातून वरील दोन्ही संस्थेने केलेले कार्य गांधीजींनी आपणास*

*दिलेल्या रचनात्मक कार्याला अनुसरुन वर्तमान कालखंडात प्रासंगिक तर आहेच पण चिरंजीवी अर्थात शाश्वत सुद्धा आहे.*

*संपूर्ण शोध निबंधासाठी व संशोधनासाठी जर थोडक्यात आढावाच सारांश रुपाने घ्यावयाचा झाल्यास शोधनिबंधात 'निष्कर्ष' या परिच्छेदात देण्यात आलेला आहे. 'जमनालाल बजाज फाउंडेशन' व 'कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा' या दोन्ही संस्थांनी विशेषत: ग्रामीण भागाची उन्नती होण्यासाठी तसेच समाजोन्नतीसाठी जणू काही व्रतच घेतले आहे. संस्थेच्या कार्याची प्रासंगिकता मला वर्तमानात फार महत्त्वाची संशोधक या नात्याने वाटते. संस्थेच्या विविध उपक्रमातून उदाहरणार्थ शिक्षण, आरोग्य सुविधा, कौशल्य प्रशिक्षण, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, जलसंवर्धन, जलसंचय यासाठी शेततळे, विहीर पुनर्भरण करणे, सेंद्रिय शेती, बायोगॅस निर्मिती, नालाबंडिंग सारखे अनेक प्रयोग केले आहे. जमनालाल बजाज हे महात्मा गांधीचे अनुयायी तर होतेच पण त्यांनी स्वतःला गांधींचे पाचवे पुत्र म्हणूनही मानले होते.*

*या शोधनिबंधाचा भविष्यात इतरही शोधकर्त्यांना शोध करताना त्यांना निश्चितच माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी फायदा होईल असे शोधकर्ता नात्याने वाटते.*

**बीज संज्ञा (Key Words) :** महात्मा गांधी, रचनात्मक कार्य, जमनालाल बजाज, कमलनयन बजाज, वर्तमान कालखंड, जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा व कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा.

---

**प्रस्तावना (Introduction) :**

शोध निबंध सादर करताना शोधनिबंधाचा विषय जाणून घेणे महत्त्वाचे असते. शोधनिबंधाचा विषय पुढील प्रमाणे आहे. "बजाज फाउंडेशनच्या समाजोपयोगी कार्याची वर्तमान प्रासंगिकता" वरील उल्लेखित विषयाची निवड करताना शोधकर्ता म्हणून ज्या संस्थेची माहिती जाणून घ्यायची आहे त्याची वर्तमान आंतरविद्याशाखेशी सहसंबंध जोडून प्रासंगिकता एक शोधार्थी म्हणून महत्त्वाची वाटते.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर अंतर्गत 'गांधी विचारधारा' विभागात आचार्य (Ph. D.) पदवी अभ्यासक्रमात अध्ययन करताना शोधकर्ता म्हणून ज्या सामाजिक सेवा करणाऱ्या समाजोपयोगी संस्थेचा माझ्या पीएच. डी. विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत आहे त्या संस्थांनी वर्तमान कालखंडात विशेषता: ग्रामीण भागात व प्रामुख्याने वर्धा जिल्ह्यातील 1387 गावांपैकी 920 गावात समाज जीवन उंचावण्यासाठी तसेच शाश्वत विकासासाठी बहुमोल असे कार्य केले आहे आणि ह्या संस्था म्हणजेच "जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा व कमलनयन जमनालाल बजाज संस्था वर्धा" ह्या आहेत. ग्रामीण जीवनमान सुधारण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या रचनात्मक कार्याचा संदेश संपूर्ण भारतभर पोहोचावा या हेतूने श्री जमनालालजी बजाज जे महात्मा गांधीचे पाचवे पुत्र म्हणून संबोधल्या जात होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनभर गांधीजींचे अनुयायी म्हणून रचनात्मक कार्य केले. स्वर्गीय जमनालालजींच्या मृत्यूनंतर त्यांची स्मृती म्हणून तसेच त्यांचे कार्य सतत चालत राहावे म्हणून जमनालाल बजाज फाउंडेशन ही संस्था 1977 मध्ये स्थापन करण्यात आली व तत्कालीन प्रधानमंत्री श्री मोरारजीभाई देसाई यांनी 4 नोव्हेंबर 1977 ला त्या संस्थेचे उद्घाटन केले. वर्धा येथील कमलनयन जमनालाल

बजाज फाउंडेशन वर्धा ही सेवाभावी संस्था 2003 मध्ये स्थापन करण्यात आली व त्या संस्थेचे कार्य इ. स. सन 2009 मध्ये सुरु करण्यात आले. या संस्थेचे प्रादेशिक कार्यालय (Regional Office) वर्धा येथे आलोडी रोडवर पार्वती लॉनच्या मागे आहे. तेथे कार्यक्रम व्यवस्थापक (Programme Manager) म्हणून श्री महेंद्रजी फाटे हे कार्यरत आहे.

शोधनिबंध सादर करताना ही पार्श्वभूमी लक्षात घेणे हे शोधकर्त्याचे कर्तव्य ठरते. वर्तमानात वरील दोन्ही संस्थांनी जे कार्य केले त्याची प्रासंगिकता किती महत्त्वाची आहे हे या शोधनिबंधातून जाणून घेता येईल. वरील उल्लेखित या दोन्ही संस्थांनी समाजोपयोगी जे कार्य केले आहे ते वर्तमानात प्रासंगिक आहेच यात कुठलेही दुमत नाही. परंतु शाश्वत विकासासाठी ही उपयोगाचे आहे. बजाज फाउंडेशन वर्धा या अंतर्गत कार्य करणाऱ्या ह्या दोन्ही संस्थांनी ग्रामीण भागात विशेषत: वर्धा जिल्ह्यात जे विविध उपक्रम राबविले गेले ते जाणून घेण्यासाठीच शोधनिबंधाच्या विषयाची निवड करण्यात आली.

**शोधनिबंधाचा विषय (Research Subject) :**

"बजाज फाउंडेशनच्या समाजोपयोगी कार्याची वर्तमान प्रासंगिकता" या विषयाच्या बाबतीत आपण वर्तमान कालखंडाचा विचार केला तर जमनालाल बजाज यांच्या जन्मानंतरचा काळ म्हणजेच 4 नोव्हेंबर 1889 नंतरचा काळ समजण्यास हरकत नाही. तसेच त्यांचे पुत्र कमलनयन जमनालाल बजाज यांच्या जन्म 23 जानेवारी 1915 ला झाला.[1] 20 व्या शतकाचा उत्तरार्ध व 21 व्या शतकाचा प्रारंभिक व मध्यकाळ विचारात घ्यावा लागेल. जमनालालजी बजाज यांचा मृत्यू दिनांक 11 फेब्रुवारी 1942 ला झाला. जमनालालजी बजाज यांना केवळ 52 वर्ष लाभले. महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने त्यांनी स्वातंत्र्यलढात भाग घेतला तर संपूर्ण जीवनभर गांधीजींच्या पावलावर पाऊल ठेवून राष्ट्रप्रेम व देश सेवा केली. त्यांचे राष्ट्रप्रेम व देश सेवा येणाऱ्या पिढीला प्रेरणादायी आहे.

वरील शोधनिबंधाचा विषय हा वर्तमान कालखंडाशी जुळलेला असल्यामुळे वर्तमानातील प्रासंगिकता किती महत्त्वाची आहे हे या शोधनिबंधाच्या माध्यमातून जाणून घेता येईल.

**संशोधनाचे उद्देश (Objectives of Research) :**

जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा व कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन वर्धा या दोन्ही सेवाभावी संस्थांनी जे समाजोपयोगी कार्य केले अर्थातच वंचित, गरीब लोकांचे, जीवनमान उंचावण्यासाठी ग्रामीण भागात केलेले कार्य जाणून घेणे व नवीन पिढीला त्याची माहिती करुन देणे हा आहे.

**संशोधनाचे महत्व (Significance of Research) :**

नवीन पिढी मागील इतिहासात काय घडले आहे यावर फारसे लक्ष देत नाही. आधुनिक काळात अर्थात वर्तमानात जे घडते त्यावर ते विशेष लक्ष केंद्रीत करतात आणि म्हणून समाजातील सेवाभावी संस्थेने आधुनिक इतिहासात काय कार्य केले आहे व भावी पिढीसाठी शाश्वत विकासासाठी केलेले कार्य ते जाणून घेण्याचा प्रयत्न करतात म्हणून वर्तमानात ऐतिहासिक संशोधनाला अतिशय महत्व आहे. ही जाणीव निर्माण करुन देण्याच्या दृष्टीने संशोधनाचे महत्व अधिक आहे. ग्रामीण भागात आजही फार मोठ्या प्रमाणात अप्रगत अवस्था आहे. ग्रामीण

भागाचा विकास होण्यासाठी अशा सेवाभावी संस्थांची अत्यंत आवश्यकता आहे.

**जमनालाल बजाज फाऊंडेशनचे वर्धा जिल्ह्यात प्रामुख्याने केलेले समाजोपयोगी कार्य :**

1. आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
2. कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण व्यवस्था करणे.
3. साक्षरता वाढविणे.
4. वैद्यकीय सोयी उपलब्ध करणे.
5. आरोग्य व स्वच्छताविषयी जागृती करणे.
6. जल व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजना जसे विहिर भरण, नाला खोदकाम, जल संचयासाठी तळे, पाऊस पाण्याचा निचरा करणे, चेकडॅम इत्यादी.
7. पर्यावरण संरक्षणासाठी उपाययोजना करणे.
8. विद्युत निर्मितीसाठी पंरपरागत साधनाचा उपयोग न करता सौर उर्जा, बायोगॅस निर्मिती प्रकल्पाची निर्मिती करणे.
9. गरीब, वंचीत कुटुंबातील जे मुले मुली शालाबाह्य आहेत त्यांची शिक्षणाची सोय करणे.
10. कुटुंब कल्याण योजना राबविणे.
11. अनौपचारिक शिक्षणाची सोय करणे.
12. कृषी व पशुपालन बाबत जागरुकता निर्माण करणे.

**कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशन वर्धा या संस्थेने वर्धा जिल्ह्यात केलेले समाजोपयोगी रचनात्मक कार्य (वार्षिक अहवाल 2011-12, 2022-23) :**

1) सेंद्रीय शेती
2) बायोगॅस निर्मिती प्रकल्प
3) नैसर्गिक पावसाचे संचयन
4) विहिर पुनर्भरण
5) गरीब वंचीत मुलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे
6) स्त्रियांचे सबलीकरण करणे
7) आरोग्य शिबीराची व्यवस्था करणे
8) जमीन सपाटीकरण करणे
9) फलोद्यान योजना राबविणे[2]

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitation) :**

शोध निबंधाच्या बाबतीत संशोधनाची व्याप्ती वाढवू शकतो परंतु या विषयाची व्यापकता फार मोठी आहे. कार्यक्षेत्र वर्धा जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. तसे पाहिले तर कमलनयन जमनालाल बजाज संस्थेचे कार्यक्षेत्र भारताच्या तीन प्रांतामध्ये आहे.

1) महाराष्टमध्ये (वर्धा जिल्हा)
2) उत्तरप्रदेशमध्ये (ललितपूर जिल्हा)
3) राजस्थान मध्ये (सिकर जिल्हा)[3]

वरील शोधनिबंधाच्या ज्या अटी आहेत त्यामध्ये संशोधनाची व्याप्ती वाढविणे अडचणीचे आहे कारण या अटीची मर्यादा असल्यामुळे व्याप्ती वाढवू शकत नाही.

रचनात्मक कार्याची माहिती ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन दुय्यम संदर्भ साधनांद्वारे प्राप्त केली आहे.

**साहित्य पुनरावलोकन (Review of Literature) :**

शोधनिबंधाचे लेखन करताना साहित्य पुनरावलोकन किंवा साहित्य समीक्षा (Literature Review) करणे अगत्याचे आहे. साहित्य समीक्षण करताना यापूर्वी या शोधनिबंधाच्या विषयाच्या विषयावर कोणी लेखन केले आहे काय? हेही माहिती मिळते आणि त्यात नेमकी कोणती उणीव आहे याचेही अवलोकन होते. तसेच आपल्या समस्येचे निराकरण करण्यासाठी वेळेअभावी प्राथमिक संदर्भ साधनाचा जरी थोडा उपयोग करुन घेतला गेला असेल तरीपण दुय्यम संदर्भ साधनांच्या माध्यमातून साहित्य समीक्षा करणे सोपे झालेले आहे. साहित्य पुनरावलोकन करताना ज्या विविध संदर्भीय पुस्तकांचा आधार घेण्यात आला त्याचा या शोधनिबंधात उल्लेख करणे तेवढेच महत्वाचे आहे. साहित्य पुनरावलोकनासाठी उपयोगात आणलेले पुस्तकांची माहिती पुढे दिलेली आहे. 'जमनालाल बजाज फाऊंडेशन' व 'कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशन' या संस्थाविषयी ज्या ज्या लेखकांनी पुस्तकांद्वारे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला व त्यांनी केलेल्या रचनात्मक कार्याची माहिती दिली त्या पुस्तकांची नावे पुढे दिलेली आहे.

प्रसाद राजेंद्र (1997) लिखित 'जमनालाल बजाज : एक जीवनी' या पुस्तकामध्ये यांनी जमनालाल बजाज यांच्या रचनात्मक कार्याबद्दल तसेच त्यांच्या ठिकाणी असलेली राष्ट्रभक्ती, समाजसेवेचे घेतलेले व्रत, महात्मा गांधी यांनी दिलेल्या ग्रामोन्नतीच्या उपदेशानुसार गरीब, वंचीत लोकांसाठी व त्यांचे राहणीमान, आर्थिक बळ वाढविणे, शिक्षण, आरोग्य यासाठी सातत्याने कार्य केले आहे हा विचार मांडला.[4]

कमलनयन जमनालाल बजाज वार्षिक अहवाल - या अहवालामध्ये संस्थेने ग्रामीण भागातील विशेषत: वर्धा जिल्ह्यातील ग्रामातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून केलेल प्रयत्न विशद केले आहे.[5]

बैस, विरेंद्र (2014) यांनी 'जमनालाल बजाज आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन' (1889 ते 1942) या पुस्तकामध्ये जमनालाल बजाज यांनी गांधीजी सोबत राहून देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. त्यांच्या ठिकाणी श्रीमंतीचा कुठलाही गर्व त्या कार्यकाळात पाहायला मिळाला नाही. खर तर त्यांनीच गांधीजींना वर्धा येथे राहण्यासाठी आग्रह केला व सेवाग्राम हे गाव जगाच्या नकाशावर भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे केंद्रस्थानी ठरले. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यभर समाज सेवेचे रचनात्मक कार्य केले. विनोबाजींना त्यांनी गुरु मानले होते.[6]

कवाडे, नरेश (2005) 'जमनालाल बजाज महात्मा गांधी संबंध आणि कार्याचा इतिहास' - वरील

शोधप्रबंधातून शोधकर्त्याने महात्मा गांधी व जमनालाल बजाज यांच्या जीवनावर व संबंधावर प्रकाश टाकला आहे. गांधीजीमुळे जमनालाल बजाज यांच्यात सेवाभावीवृत्ती जोपासल्या गेल्यामुळे त्यांनी ग्रामीण भागातील लोकांशी सातत्याने संपर्क करुन बहुमोल असे कार्य वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण लोकांसाठी केले आहे.[7]

बैस, विरेंद्र (2005) यांनी 'वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोनाचा इतिहास' या पुस्तकातून लेखकाने वर्धा जिल्ह्यातील आंदोलनाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे व जमनालाल बजाज यांचेही रचनात्मक कार्यात मोठे योगदान असल्याचे म्हटले आहे.[8]

विनोद कुमार (2020) यांनी 'जमनालाज बजाज फाऊंडेशन : रचनात्मक कार्य संस्था' या पुस्तकात आधुनिक इतिहासातील कालखंडात जमनालाल बजाज फाऊंडेशनचे रचनात्मक कार्यात योगदान या बद्दलची माहिती सांगितली आहे. अनेक गरीब, वंचीत कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेने रचनात्मक कार्य केलेले आहे.[9]

त्रिवेदी काशिनाथ (2014) यांनी ‘रचनात्मक कार्यक्रम, उसका रहस्य और स्थान’ या पुस्तकातील महात्मा गांधींनी दिलेल्या रचनात्मक कार्याची अठरा प्रकरणात वेगवेगळी विभागणी केली आहे. त्यापैकी गावाची स्वच्छता, आर्थिक समानता, स्त्रियांचे सबलीकरण, विद्यार्थ्यांचे (गरीब, वंचीत घटकातील) शिक्षण, आरोग्य जाणीव अशा विविध रचनात्मक कार्यासाठी संस्थेने सेवाभावी वृत्तीने काम केलेले आहे.[10]

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (2017) ग्रामगीतेमध्ये आपल्या एका ओवीमध्ये लिहितात की, गाव हा विश्वाचा नकाशा | गावावरुन देशाची परीक्षा | गावचि भंगता अवदशा, येईल देशा ||

वरील ओवीमध्ये गावाचे महत्व फार मोठे मानले आहे. विश्वाचा नकाशा म्हणजेच गाव होय आणि या गावाला समृध्द करण्यासाठी गांधी, विनोबा यांच्या समवेत राष्ट्रसंतांनीही स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला व गांधीच्या स्वप्नांना पूर्ण करण्याचा प्रयत्न ग्रामगीतेतून तत्कालीन परिस्थितीमध्ये म्हणजेच कमलनयन बजाज व जमनालाल बजाज यांच्याच ऐतिहासिक कालखंडात केलेला आहे.[11]

जी आय झेड व बजाज फाऊंडेशनच्या अहवालात असे नमुद केले आहे की, जलस्त्रोत विकास व जलसंवर्धन कार्यक्रमाचा उद्देश भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे व शेतीच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देणे आहे. पाण्याची पातळी वाढविण्यासाठी नदी व नाल्यावर बंधारे बांधणे, विहिर पुनर्भरण, शेततळे, लिफ्ट इरिगेशन इत्यादी कार्यात्मक कार्य फाऊंडेशनने केले आहे.[12]

**संशोधन पध्दती (Research Methodology) :**

हे संशोधन ऐतिहासिक संशोधन पध्दती वापरुन करण्यात आले आहे. संशोधनासाठी 'जमनालाल बजाज फाऊंडेशन' व 'कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशनच्या' आधुनिक इतिहासा बद्दलची माहिती दुय्यम संदर्भ साधनांच्या माध्यमातून गोळा करण्यात आलेली आहे. यासाठी संस्थेचे वार्षिक अहवाल, माहिती पत्रक, विविध संदर्भीय पुस्तके, ग्रंथ आणि वर्तमान पत्रातील लेख आणि इतरही साहित्याचा यात उपयोग केला आहे.

डेटा संग्रहण करण्यासाठी संदर्भीय पुस्तके, लेख आणि इतर साहित्याचा वापर करण्यात आला आहे. तसेच याशिवाय 'कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशनचे' प्रोग्राम व्यवस्थापक श्री महेंद्र फाटे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तसेच तेथील इतर सहाय्यक जसे श्री राहूल बोरकुटे यांच्याकडुनही माहिती गोळा करण्यात आली आहे.

**संशोधन उद्दिष्ट :**

जमनालाल बजाज फाऊंडेशनचे समाजोपयोगी रचनात्मक कार्यात योगदान व आधुनिक (वर्तमान) इतिहास कालखंडातील त्यांचे महत्व याबद्दल अधिक माहिती जाणून घेणे व व पुढील पिढीला त्याची जाणीव करुन देणे आहे.

**परिणाम (Result) :**

शोधनिबंधाच्या निमित्ताने जेव्हा संशोधन करण्यासाठी साहित्य पुनरावलोकन व साहित्य समीक्षा करण्यात आली, त्यासाठी प्राथमिक व द्वितीय संदर्भ साधनांच्याद्वारे पुस्तके, माहिती पत्रक, लेख व प्रत्यक्ष अधिकाऱ्यांसोबत भेट घेऊन त्यांच्याकडून जी माहिती गोळा करण्यात आली. त्या माहितीचा अभ्यास केल्यानंतर असे निदर्शनास आले की, 'जमनालाल बजाज फाऊंडेशन' व 'कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशन' या संस्थानी वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी, त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी, आरोग्य संवर्धनासाठी वंचित व गरीब घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोयी, कौशल्य विकास करण्यासाठी प्रशिक्षण कार्य, पाण्याच्या सिंचन व्यवस्थेसाठी शेततळे, विहिर पुनर्भरण, नाला खोलीकरण, जलसंचय (Water Harvesting) बायोगॅस व सौरउर्जा सारख्या अपारंपरिक शक्तींची निर्मिती करणे इत्यादी बाबींवर आधुनिक कालखंडात विशेष भर दिलेला आहे व त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुर गरीब वंचित लोकांच्या आर्थिक उत्पन्नात निश्चितच भर पडलेली आहे. शेतीची मशागत, सेंद्रिय शेती करुन धान्य, फलोत्पादन करणे यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे महत्व ग्रामीण भागातील लोकांना कळायला लागले आहे. ही फार मोठी जाणीव जागृती लोकांच्या ठिकाणी झालेली दिसते. बजाज फाऊंडेशनने बहुमोल कार्य ग्रामीण भागात केलेले आहे. ही माहिती या संशोधनाच्या माध्यमातून समोर आलेली आहे. आधुनिक कालखंडात याची नितांत आवश्यकता आहे. वर्तमानातील ही प्रासंगिकता अनन्य साधारण आहे. आरोग्य शिबीर घेऊन आरोग्याच्या बद्दलची जागरुकता लोकांमध्ये पाहायला मिळते. अर्थातच हा परिणाम बजाज फाऊंडेशने केलेल्या समाजोपयोगी रचनात्मक कार्याचा आहे.

एकंदरीत बजाज फाऊंडेशनने आधुनिक ऐतिहासिक कालखंडात रचनात्मक कार्याच्या माध्यमातून ग्रामोन्नतीसाठी तसेच ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांची आर्थिक क्षमता वाढविण्यासाठी, आरोग्य संवर्धनासाठी, पर्यावरण रक्षणासाठी तसेच शाश्वत विकासासाठी बहुमोल असे कार्य केलेले आहे.

**निष्कर्ष (Conclusion) :**

आधुनिक वर्तमान ऐतिहासिक कालखंडात रचनात्मक कार्यातून समाजासाठी बजाज फाऊंडेशन संस्थेने फार मोठे योगदान केलेले आहे. वर्तमानात त्याचे महत्व तसेच अधिक माहिती प्रदान करण्यासाठी हे संशोधन करण्यात आलेले आहे.

**मुख्य निष्कर्ष (Main Conclusion) :**

1. जमनालाल बजाज फाऊंडेशन व कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशनने आधुनिक इतिहासातील कालखंडात समाजोपयोगी रचनात्मक कार्यात महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.
2. वरील संस्थेने शिक्षण, आरोग्य सुविधा, कौशल्य प्रशिक्षण, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण यासाठी फारमोठे सहकार्य केले आहे.
3. गरीब आणि वंचित लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी तसेच आर्थिक वृध्दिसाठी की, ज्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल व त्यांना त्यांच्या गरजा पूर्ण करता येतील त्यासाठी फार मोठे कार्य केले आहे.
4. समाजसेवेचे व्रत हे तर जमनालाल बजाज यांचे ब्रिदच होते. त्यांच्या हयातीत सुध्दा त्यांनी या कार्यात स्वत:ला झोकून दिले होते.

**संदर्भ सूची :**


- माहिती पत्रक (2014). *जमनालाल बजाज 04.11.1889-11.02.1942, 125 वीं जयंती*. बजाज गृप.
- कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशनचा वार्षिक अहवाल. (2011-2012, 2022-2023).
- पूर्वोक्त.
- प्रसाद, राजेंद्र (1997). *जमनालाल बजाज : एक जीवनी*. नॅशनल बूक ट्रस्ट.
- कमलनयन जमनालाल बजाज वार्षिक अहवाल. (2011-2012, 2022-2023).
- बैस, विरेंद्र गोपालसिंह (2014). *जमनालाल बजाज आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन (1889 ते 1942)*. सर साहित्य केंद्र.
- कवाडे, नरेश देवरावजी (2005). *जमनालाल बजाज - महात्मा गांधी संबंध आणि कार्याचा इतिहास* (अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध). राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
- बैस, विरेंद्र गोपालसिंह (2005). *वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास*.
- विनोद कुमार (2020). *जमनालाल बजाज फाऊंडेशन : रचनात्मक कार्य संस्था*. स्टेर्लिंग पब्लिशर्स.
- त्रिवेदी, काशिनाथ (अनु.) (2014). *रचनात्मक कार्यक्रम उसका रहस्य और स्थान* (पुनर्मुद्रण). नवजीवन प्रकाशन मंदिर.
- राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज (2017). *ग्रामगीता*. साहित्य प्रकाशन समिती अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी.
- जी आई झेड व बजाज फाऊंडेशन यांचा संयुक्त प्रकल्प, जलसंवर्धन प्रकल्प. बजाज फाऊंडेशन.